# Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University,
## Chhatrapati Sambhajinagar-431004 (M.S.) India
### Board of Examinations & Evaluation

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**Office PBX:** 0240-2403399/400
**Office Phone:** 0240-2403178/201

Estd.1958
NAAC Re-accredited A+ Grade

**Website** www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac
**E-Mail:** director.exameval@bamu.ac.in


**परिपत्रक/परीक्षा व मूल्यमापन मंडळ/महाराष्ट्र लोकसेवा हक्क/२०२६** 347

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/परिसंस्थांचे संचालक तसेच संचालक, विद्यापीठ उपपरिसर, धाराशिव यांना मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशानुसार या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचे २८ एप्रिल हा दिवस "सेवा हक्क दिन" म्हणून साजरा करणेबाबतचे पत्र संदर्भ क्र. जा.क्र. २०२६/मशाका/जिनीकक्ष/कावि-दि. २७-०३-२०२६ या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

उपरोक्त संदर्भीय पत्रासोबत मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग, राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय, मुंबई यांचे पत्र क्र. बैठक-२०२६/प्र.क्र.०४/मुसेह आ/कक्ष-२, दि. २०-०३-२०२६ प्राप्त झाले आहे व या पत्राअन्वये दि. २८ एप्रिल, २०२६ रोजी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या अंमलबजावणीस दहा वर्षे पूर्ण होत असल्याने दशकपूर्वीच्या औचित्याने **२८ एप्रिल हा दिवस "सेवा हक्क दिवस"** म्हणून साजरा करत असतांना; त्यांच्या पत्रासोबतच्या प्रपत्र-ब मध्ये नमूद तपशिलानुसार विशेष उपक्रम राबवून जनसहभागासह नागरिकांमध्ये उक्त अधिनियमाबाबत, राज्य सेवा हक्क आयोगाबाबत तसेच आपले सरकार पोर्टलमार्फत ऑनलाईन उपलब्ध सेवांबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत असे निवासी उपजिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांच्या पत्रात नमूद केले आहे. त्यामुळे सर्व प्राचार्य/संचालक यांनी या परिपत्रकासोबत संदर्भीय पत्र व त्यासोबतचे प्रपत्र-अ आणि प्रपत्र-ब जोडले आहे त्याप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या कार्यालयाच्या arregistrar.exam@bamu.ac.in या ई-मेलवर दि. ०५-०५-२०२६ रोजीपर्यंत पाठवावा. जेणेकरून, सर्व संलग्नित महाविद्यालये/परिसंस्थांचा एकत्रित अहवाल शासनास पाठविणे सुकर होईल. या परिपत्रकासोबत संदर्भीय शासन पत्राची प्रत जोडली आहे. तसेच अधीक माहितीसाठी विद्यापीठ संकेतस्थळावर आपले सरकार पोर्टल लिंकवर माहिती पहावी. तसेच विद्यापीठामार्फत पुरविण्यात येणाऱ्या २० सेवांची यादी या परिपत्रकासोबत जोडण्यात येत आहे.

परिपत्रक सर्वसंबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे ही विनंती. हे परिपत्रक विद्यापीठाच्या www.bamu.ac.in, http://bamua.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**संदर्भ क्र.** पवमूमं/लोक सेवा हक्क/२०२६/347
**दिनांकः** २४-०४-२०२६.

**वरि.प्रो. (डॉ.) बाबासाहेब एन. डोळे**
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

# जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

**जिल्हा नियंत्रण कक्ष**

दुरध्वनी क्रमांक – 0240-2331077

ई-मेल abdcolloffice@gmail.com website aurangabad.nic.in


जा.क्र.2026/मशाका/जिनीकक्ष/कावि- दिनांक -27/03/2026

**28 एप्रिल हा दिवस " सेवा हक्क दिन" म्हणून साजरा करणेबाबत**

प्रती,

1) मा. आयुक्त, महानगर पालिका, छत्रपती संभाजीनगर
2) मा. पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर
3) मा. जिल्हा पोलीस अधीक्षक ग्रामीण, छत्रपती संभाजीनगर
4) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर
5) प्रशासक, सिडको, छत्रपती संभाजीनगर
6) मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा, छत्रपती संभाजीनगर
7) मुख्याधिकारी, छत्रपती संभाजीनगर गृह निर्माण व क्षेत्रीय विकास मंडळ, छत्रपती संभाजीनगर
8) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर
9) कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, छत्रपती संभाजीनगर
10) अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण मंडळ मर्यादित, छत्रपती संभाजीनगर
11) अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, छत्रपती संभाजीनगर
12) उपायुक्त, जिल्हा पशु संवर्धन कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
13) सह आयुक्त, अन्न व औषधे प्रशासन, छत्रपती संभाजीनगर
14) सहायक आयुक्त, मत्स्य विकास कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
15) सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग, छत्रपती संभाजीनगर
16) उपायुक्त, वस्तु व सेवा कर विभाग, छत्रपती संभाजीनगर
17) उपायुक्त, जिल्हा जात पडताळणी, छत्रपती संभाजीनगर
18) उपायुक्त, कामगार विभाग, छत्रपती संभाजीनगर
19) जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, छत्रपती संभाजीनगर
20) जिल्हा शल्य चिकित्सक, छत्रपती संभाजीनगर
21) जिल्हा आरोग्य अधिकारी, छत्रपती संभाजीनगर
22) जिल्हा खनिकर्म अधिकारी, छत्रपती संभाजीनगर
23) जिल्हा क्रीडा अधिकारी, छत्रपती संभाजीनगर
24) जिल्हा व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, छत्रपती संभाजीनगर
25) जिल्हा खादी ग्रामोद्योग अधिकारी, छत्रपती संभाजीनगर
26) जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, छत्रपती संभाजीनगर

5846
114126

27) जिल्हा जलसंधारण अधिकारी, छत्रपती संभाजीनगर
28) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर
29) जिल्हा पुरवठा अधिकारी, छत्रपती संभाजीनगर
30) जिल्हा समाजकल्याण अधिकारी, छत्रपती संभाजीनगर
31) जिल्हा कार्यक्रम अधिकारी, बालविकास, जि.प छत्रपती संभाजीनगर
32) कार्यकारी अभियंता, जागतीक बँक प्रकल्प, छत्रपती संभाजीनगर
33) उपसंचालक, कौशल्य विकास व रोजगार उद्योजकता कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
34) मुख्य वन आयुक्त वन संरक्षक, छत्रपती संभाजीनगर
35) उप वन संरक्षक, छत्रपती संभाजीनगर वन विभाग, छत्रपती संभाजीनगर
36) विभागीय तंत्रशिक्षण कार्यालय, छत्रपती संभाजी नगर
37) व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य पर्यटन, छत्रपती संभाजीनगर
38) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प, छत्रपती संभाजीनगर
39) प्रकल्प संचालक, ग्रामिण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर
40) प्रकल्प अधिकारी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, छत्रपती संभाजीनगर
41) सहायक नियंत्रक, वजन व मापे कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
42) सहा. राज्यकर आयुक्त, जीएसटी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
43) सहायक संचालक, नगर रचनाकार, छत्रपती संभाजीनगर
44) उप निबंधक, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर
45) कार्यकारी अभियंता, लघु बंधारे सिंचनालय परिसर, छत्रपती संभाजीनगर
46) प्रादेशिक परिवहन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर
47) शिक्षणाधिकारी माध्यमिक, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर
48) शिक्षणाधिकारी प्राथमिक, जिल्हा परिषद , छत्रपती संभाजीनगर
49) प्रबंधक, डॉ. बाबासाहेब आंबडेकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर
50) संचालक, मराठी भाषा, छत्रपती संभाजीनगर
51) सहायक अधीक्षक, विधी व न्याय विभाग, छत्रपती संभाजीनगर
52) सहायक संचालक, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, छत्रपती संभाजीनगर
53) उपसंचालक (पर्यटन) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र राज्य पर्यटन, छत्रपती संभाजीनगर
54) सह संचालक, उच्च शिक्षण विभाग, रेल्वे स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर
55) विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ, छत्रपती संभाजीनगर
56) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर
57) वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर
58) विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, छत्रपती संभाजीनगर
59) उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजीनगर
60) सह जिल्हा निबंधक नोंदणी व मुद्रांक शुल्क, वर्ग – 1, छत्रपती संभाजीनगर

61) महा व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, छत्रपती संभाजीनगर
62) रेशीम विकास अधिकारी, छत्रपती संभाजीनगर
63) धर्मदाय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
64) सर्व मुख्याधिकारी नगर परिषद/नगर पंचायत, छत्रपती संभाजीनगर
65) व्यवस्थापक, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ, छत्रपती संभाजीनगर
66) नियोजन अधिकारी, अल्पसंख्यांक विभाग, छत्रपती संभाजीनगर
67) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर
68) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रक मंडळ, छत्रपती संभाजीनगर
69) सर्व उपविभागीय अधिकारी, जिल्हा छत्रपती संभाजीनगर
70) सर्व तहसीलदार, जिल्हा छत्रपती संभाजीनगर
71) सहायक संचालक, मराठवाडा पुराभिलेखागार, बजरंगचौक छत्रपती संभाजीनगर
72) वरिष्ठ कोषागार अधिकारी, छत्रपती संभाजीनगर
73) अधीक्षक अभियंता, सिंचन विभाग, छत्रपती संभाजीनगर
74) प्रकल्प संचालक, ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर
75) मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत उर्जा विभाग, छत्रपती संभाजीनगर
76) अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत उर्जा विभाग, छत्रपती संभाजीनगर
77) शासकीय सावित्रीबाई महिला राज्यगृह छत्रपती संभाजीनगर
78) जिल्हा कोषागार अधिकारी, छत्रपती संभाजीनगर
79) कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प, बांधकाम भवन, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर

विषयः- **28 एप्रिल हा दिवस "सेवा हक्क दिन" म्हणून साजरा करणेबाबत**

संदर्भ — 1. श्री. प.नं.बहुरे, उप सचिव, राज्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, कनककुंज, दुसरा मजला, जुबली पार्क ते जी.टी.एसरोड, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र क्र. 2026/रा.से.ह.आ./कार्या-आरटीएस/117, दिनांक 25/03/2026

2. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र सा.प्र/94/2024 लोकसेवा दिन, दिनांक 01 एप्रिल 2025

3. मा. सचिव, महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग, राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय, मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण - 2026/प्र.क्र 04/मुसेहआ/कक्ष 2 दिनांक 20/03/2026

महोदय,

उक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. सा.प्र/94/2024 लोकसेवा दिन, दि.01 एप्रिल, 2025 निर्गमित करून 28 एप्रिल

हा दिवस "सेवा हक्क दिन" म्हणून साजरा करण्यास मान्यता दिली आहे. तसेच मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग, राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय, मुंबई यांचे पत्र क्र. बैठक-2026/प्र.क्र. 04/मुसेह आ/कक्ष-2, दि. 20.03.2026 (प्रत संलग्न) च्या अन्वये दि.28 एप्रिल, 2026 रोजी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या अंमलबजावणीस दहा वर्ष पूर्ण होत असल्याने, या दशकपूर्तीचे औचित्य साधून जिल्हास्तरावर तसेच ग्रामपातळीवर विशेष उपक्रम राबविण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. या पार्श्वभुमीवर, **दि.28 एप्रिल, 2026 रोजी आपण आपल्या विभागा मध्ये "सेवा हक्क दिवस"** तसेच महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 च्या दशकपूर्तीचे औचित्य साधून विविध उपक्रम राबवून हा दिवस जनसहभागासह साजरा करावा व नागरिकांमध्ये उक्त अधिनियमाबाबत, राज्य सेवा हक्क आयोगाबाबत तसेच आपले सरकार पोर्टल मार्फत ऑनलाईन उपलब्ध सेवांबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत. या अनुषंगाने ग्रामपातळीवर आयोजित करावयाच्या उदाहरणादाखल कार्यक्रमांचा तपशिल सोबत जोडलेल्या प्रपत्र-अ मध्ये व जिल्हापातळीवर आयोजित करावयाच्या उदाहरणादाखल कार्यक्रमांचा तपशिल प्रपत्र-ब मध्ये दिला आहे.

वरीलप्रमाणे आपल्या कार्यालयात व क्षेत्रीय कार्यालयामध्ये 28 एप्रिल हा दिवस सेवा हक्क दिन म्हणून साजरा करणे बाबत कार्यवाही करून अनुपालन अहवाल या कार्यालयास दि.10 मे, 2026 पूर्वी सादर करण्यात यावा, ही विनंती

सोबत :- संदर्भीय शासनाचे पत्र

आपला विश्वासू

(जनार्धन विधाते)

निवासी उपजिल्हाधिकारी,

जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

प्रतीलिपी

1) मा. सचिव, राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय, नवीन प्रशासन भवन सातवा मजला, मंत्रालय समोर, मुंबई 32 यांना माहितीस्तव सविनय सादर
2) मा. विभागीय आयुक्त, (महसूल) विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव सविनय सादर
3) मा. आयुक्त, राज्य सेवा हक्क, आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव सविनय सादर

(जनार्धन विधाते)

निवासी उपजिल्हाधिकारी,

जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

महाराष्ट्र शासन
राज्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
कनककुंज बिल्डींग, दुसरा मजला, जुबली पार्क ते जी.टी.एसरोड, छत्रपती संभाजीनगर ४३१००१
crtsabad@gmail.com
दुरध्वनी क्र:- ०२४०-२९९०२२९

जा.क्रं.२०२६/रा.से.ह.आ./कार्या-आरटीएस/ ११७

दिनांक:- २५ मार्च,२०२६

प्रति,

१) जिल्हाधिकारी (सर्व)
२) मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)
छत्रपती संभाजीनगर विभाग

**विषय:- २८ एप्रिल हा दिवस सेवा हक्क दिन म्हणून साजरा करणे बाबत.**

संदर्भ:- १)सचिव, महाराष्ट्र राज्य मुख्य सेवा हक्क आयोग मुंबई यांचे पत्र क्रं.संकिर्ण-२०२६/प्र.क्र.०४/मुसेहआ/कक्ष-२ दिनांक २० मार्च, २०२६.

**महोदय,**

उपराक्त विषयाचे संदर्भिय पत्र कृपया पहावे (सुलभ संदर्भासाठी सोबत प्रत संलग्न).

दिनांक २८ एप्रिल, २०२६ हा दिवस जिल्हयामध्ये सेवा हक्क दिन म्हणून साजरा करण्याबाबत सदर पत्रान्वये निर्देश देण्यात आलेले आहेत. यानुषंगाने जिल्हयामध्ये ग्रामपंचायत स्तरावर आणि जिल्हास्तरावर विविध उपक्रम राबवून हा दिवस उत्साहात जनसहभागासह साजरा करण्याबाबत सुचित करण्यात आलेले आहे. करिता आपणांस कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रान्वये देण्यात आलेल्या निर्देशांनुसार आवश्यक कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल दिनांक ३१ मे, २०२६ पर्यंत आयोगाकडे सादर करावा, ही विनंती.

सोबत- संदर्भिय पत्राची प्रत.

(प.नं.बहुरे)
**उप सचिव**

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.**
मा.विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग छत्रपती संभाजीनगर.

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग
राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय,
नवीन प्रशासन भवन, ७ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२

आपली सेवा आमचे कर्तव्य
ई-मेल :-ccrts@maharashtra.gov.in
दुरध्वनी :-०२२-२२८३२३४६

क्र. संकिर्ण-२०२६/प्र.क्र.०४/मुसेहआ/कक्षा-२
दिनांक :- २० मार्च, २०२६

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

विषय:- २८ एप्रिल हा दिवस "सेवा हक्क दिन" म्हणून साजर करणेबाबत.
संदर्भ :- सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.GAD/१४/२०२४-Lokshahidin, दि.०१ एप्रिल, २०२५

महोदय,

शासनाने, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.GAD/१४/२०२४-Lokshahidin, दि.०१ एप्रिल, २०२५ निर्गमित करून २८ एप्रिल हा दिवस "सेवा हक्क दिन" म्हणून साजरा करण्यास मान्यता दिली आहे. मागील वर्षी दि.२८.०४.२०२५ या दिवशी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीचा दशकपूर्ती सोहळा आपल्या सहकार्याने व सहभागाने उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. याबद्दल आपले मनःपूर्वक अभिनंदन व धन्यवाद. त्याच्प्रमाणे यावर्षी देखील दि. २८.०४.२०२६ रोजी "सेवा हक्क दिन" साजरा करण्याचे नियोजित आहे.

त्यानुषंगाने दि.२८ एप्रिल, २०२६ रोजी आपण आपल्या जिल्ह्यामध्ये "सेवा हक्क दिना" चे औचित्य साधून विविध उपक्रम राबवून हा दिवस जनसहभागासह साजरा करावा व नागरिकांमध्ये उक्त अधिनियमाबाबत, राज्य सेवा हक्क आयोगाबाबत तसेच आपले सरकार पोर्टल मार्फत ऑनलाईन उपलब्ध सेवांबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत. या अनुषंगाने ग्रामपातळीवर आयोजित करावयाच्या उदाहरणादाखल कार्यक्रमांचा तपशिल सोबत जोडलेल्या प्रपत्र-अ मध्ये व जिल्हापातळीवर आयोजित करावयाच्या उदाहरणादाखल कार्यक्रमांचा तपशिल प्रपत्र-ब मध्ये दिला आहे.

कृपया वरीलप्रमाणे कार्यवाही करून अनुपालन अहवाल आयोगास दि.३१ मे, २०२६ पर्यंत पाठवावा.

आपली विश्वासू,

(वैशाली राज चव्हाण (निर्धार))
सचिव,
महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग

प्रत- १. सर्व राज्य सेवा हक्क आयुक्त
२. सर्व विभागीय आयुक्त (महसूल)

कृपया सदर पत्रास अनुसरून आपल्या विभागातील सर्व जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी "सेवा हक्क दिवसाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमांची उत्फूर्तपणे अंमलबजावणी करण्यासाठी आपण सत्वर समक्षात किंवा व्ही.सी. द्वारे बैठका घेऊन त्यांना मार्गदर्शन करावे व सदर दिवस यशस्वीरीत्या साजरा होईल, यासाठी आपण जातीने लक्ष द्यावे, ही विनंती.

Scanned with OKEN Scanner

## प्रपत्र –अ

| अ.क्र. | सेवा हक्क दिनाच्या निमित्ताने ग्रामपंचायत स्तरावर आयोजित करावयाचे कार्यक्रम |
|---|---|
| १ | दि.२८.०४.२०२६ रोजी सर्व ग्रामपंचायतींमध्ये ग्रामपंचायतीच्या विशेष सभेचे आयोजन करणे, त्यात महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या प्रती सर्व ग्रामपंचायत सदस्यांना देणे व उक्त कायद्याच्या ठळक तरतूदींचे वाचन करणे. (नमूना संलग्न) |
| २ | दि. ०१.०५.२०२६ रोजी सर्व ग्रामपंयतींमध्ये विशेष ग्रामसभेचे आयोजन करणे व त्यात महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या ठळक तरतूदीचे वाचन करणे. |
| ३ | प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत विहित सूचना फलक या पूर्वी लावले नसल्यास तसे माहिती फलक लावणे. (नमूना संलग्न) |
| ४ | प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये अधिसूचित सेवांची व शुल्कांची माहिती देणारा QR CODE लावणे. |
| ५ | प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये तक्रार नोंदवण्यासाठी QR CODE लावणे. |
| ६ | ग्रामविकास विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र.आरटीएस-३८२४/प्र.क्र.८९/मातंक, दि.२८ जानेवारी, २०२५ प्रमाणे ग्रामपंचायत स्तरावरील आपले सरकार सेवा केंद्रांमार्फत अधिसूचित करण्यात आलेल्या सर्व ऑनलाईन सेवा नागरिकांना उपलब्ध करून देण्याची सुरूवात अद्याप झाली नसल्यास तशी सुरूवात करणे. |
| ७ | ग्रामपंचायत स्तरावर उभारावयाच्या आदर्श आपले सरकार सेवा केंद्राचे उद्घाटन/ कोनशिला समारंभ दि.२८.०४.२०२६ रोजी आयोजित करणे. |

Scanned with OKEN Scanner

## प्रपत्र —ब

| अ.क्र. | सेवा हक्क दिनाच्या निमित्ताने जिल्हा स्तरावर आयोजित करावयाचे कार्यक्रम |
|---|---|
| १ | जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयात दि.२८.०४.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता सर्व पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय प्राधिकारी व सर्व संबंधित कर्मचारी/ अधिकारी यांनी सेवेची बांधिलकी मानणारी शपथ घेणे. (शपथेचा नमूना संलग्न) |
| २ | "सेवा हक्क दिवसा" च्या अनुषंगाने मा. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील सर्व मा. खासदार, मा. आमदार, इतर लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था, पत्रकार, नागरिक यांचे उपस्थितीत समारंभाचे आयोजन करणे. सदर कार्यक्रमांतर्गत -<br>i. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ ची वैशिष्ट्ये विषद करणे.<br>ii. विविध विभागांच्या सेवा देण्याच्या कामाचा आढावा सादर करणे.<br>iii. उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचा गौरव करणे. |
| ३ | आदर्श आपले सरकार केंद्राचे उद्‌घाटन/ कोनशिला समारंभ दि.२८.०४.२०२६ रोजी आयोजित करणे. |
| ४ | जिल्ह्यात सेवादूत योजना सुरू करणे. |
| ५ | सर्व आपले सरकार केंद्र व सर्व शासकीय कार्यालयात सेवांची व शुल्कांची माहिती देणारा QR CODE लावल्याची सुनिश्चिती करणे. |
| ६ | दि.२८.०४.२०२६ रोजी नागरिकांना SMS व्दारा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाबाबत व आपले सरकार पोर्टलबाबत अवगत करणे. (यासाठी जिल्हा सेतू मधील निधीचा वापर करता येईल.) (SMS चा नमूना संलग्न) |
| ७ | जिल्ह्यातील गर्दीचे ठिकाणी जसे की, आठवडी बाजार , पर्यटन स्थळे, तीर्थ स्थळे, इत्यादी ठिकाणी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ विषयी माहिती फलक (QR कोडसह) प्रदर्शित करणे. |
| ८ | विद्यार्थी/ महिला/ इतर घटक यांचेशी सदर कायद्याविषयी सुसंवाद साधून सदर कायद्याविषयी जनजागृती करण्याच्या दृष्टीने दि.२८.०४.२०२६ रोजी मेळाव्यांचे आयोजन करणे. |
| ९ | शालेय/ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५, राज्य सेवा हक्क आयोग व आपले सरकार पोर्टल या संदर्भात दि.२८.०४.२०२६ रोजी निबंध स्पर्धा/वक्तृत्व स्पर्धा परिसंवाद इ. चे आयोजन करणे. |
| १० | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या व्यापक व प्रचार व प्रसिध्दी साठी भारत स्काउट, एन.सी.सी. व एन.एस.एस. च्या विद्यार्थ्यांचा सहभाग घेऊन दि.२८.०४.२०२६ रोजी व्यापक स्वरूपात कार्यक्रमांचे आयोजन करणे. |
| ११ | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५च्या प्रचारासाठी समाज माध्यमांचा वापर सुरू करणे. |
| १२ | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५च्या प्रचारासाठी पथनाट्य, नाटके, गाणे, लोक कलांचा वापर सुरू करणे. |

Scanned with OKEN Scanner

## महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ ची उद्दिष्टे आणि ठळक वैशिष्ट्ये :-

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ हा एक क्रांतीकारी कायदा असून त्यामध्ये अनेक वैशिष्ठ्ये आहेत जी इतर राज्यांच्या तद्अनुषंगिक कायद्यांपेक्षा वेगळी आहेत. लोकसेवा वितरित करताना खालील बाबी साध्य करण्याचा या कायद्याचा उद्देश आहे-

- पारदर्शकता
- उत्तरदायित्व
- कालबध्दता
- कार्यक्षमता

डिझिटल मंचाचा उपयोग करुन लोकसेवा वितरणामध्ये सक्षमता व पारदर्शकतेच्या संस्कृतीस चालना देण्यावर या कायद्याचा भर आहे. नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सार्वजनिक सेवांचा दर्जा उंचावणे व त्या विहित कालावधीत व जबाबदारीपुर्वक पुरविल्या जातील याची खात्री करणे हे या कायद्याचे प्राथमिक उद्दिष्ट आहे.

- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या कलम ३ नुसार, प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत आणि त्यानंतर वेळोवेळी ते पुरवीत असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपीलीय प्राधिकारी आणि द्वितीय अपीलीय प्राधिकारी यांचा तपशील आणि नियत कालमर्यादा या अधिनियमाखाली अधिसूचित करील. (कलम -३)
- प्रत्येक पात्र व्यक्तीस (कायदेशीर, तांत्रिक, आर्थिक व्यवहार्यतेच्या अधीन राहून) या अधिनियमानुसार राज्यातील लोकसेवा नियत कालमर्यादेच्या आत प्राप्त करण्याचा हक्क असेल. (कलम-४)
- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ नुसार कोणतीही अधिसूचित लोकसेवा मिळविण्यासाठी कोणत्याही पात्र व्यक्तीस पदनिर्देशित अधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल. असा अर्ज निकाली काढण्यासाठी नियत केलेल्या कालमर्यादेसह, अर्ज मिळाल्याचा दिनांक एका विशिष्ट अर्ज क्रमांकासह अर्जदारास देण्यात येईल. (कलम -५)
- प्रत्येक अर्जदार त्याला प्रदान केलेल्या विशिष्ट अर्ज क्रमांकासह त्याच्या ऑनलाइन अर्जाच्या स्थितीची पाहणी करू शकतो. (कलम -६)
- उक्त अधिनियमानुसार कोणतीही पात्र व्यक्ती ज्याचा अर्ज फेटाळला गेला आहे किंवा ज्याला नियत कालमर्यादेच्या आत लोकसेवा प्रदान केली गेली नसेल अशी कोणतीही पात्र व्यक्ती, अर्ज फेटाळल्याचा आदेश मिळाल्याच्या किंवा नियत कालमर्यादा समाप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याकडे अपील दाखल करू शकते. {कलम -९ (१)}
- प्रथम अपीलीय प्राधिकारी, आपल्या आदेशात पात्र व्यक्तीला सेवा देण्यासाठी पदनिर्देशित अधिकाऱ्याला निर्देश देऊ शकतात किंवा त्यास अपील दाखल केल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत अपील फेटाळण्याची कारणे लेखी नमूद करून अपील फेटाळू शकतात. {कलम -९ (२)}
- प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या आदेशाविरुद्ध अर्जदार, प्रथम अपील प्राधिकाऱ्याचा आदेश प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या कालावधीत द्वितीय अपीलीय प्राधिकाऱ्याकडे द्वितीय अपील दाखल करू शकतो. {कलम -९ (३)}
- पदनिर्देशित अधिकारी पुरेशा आणि वाजवी कारणाशिवाय लोकसेवा प्रदान करण्यात अयशस्वी झाल्यास, रु. ५००/- पेक्षा कमी नसेल परंतू ५०००/- रूपयांपर्यंत असू शकेल एवढी शास्ती संबंधित पदनिर्देशित अधिकाऱ्यावर लादली जाऊ शकते. (कलम -१०)
- संबंधित पदनिर्देशित अधिकारी किंवा प्रथम अपीलीय प्राधिकारी संबंधित अपीलीय प्राधिकारी किंवा आयोगाकडून असे पत्र प्राप्त झाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत दंडाची रक्कम भरतील.असे करण्यात कसूर केल्यास दंडाची रक्कम त्यांच्या वेतनातून वसूल केली जाईल. (कलम -११)



Scanned with OKEN Scanner

- लोकसेवा प्रदान करण्यात संबंधित पदनिर्देशित अधिका-याकडून वारंवार कसूरीबद्दल किंवा विलंब झाल्याबद्दल द्वितीय अपीलीय प्राधिकाऱ्याकडून सूचना प्राप्त झाल्यानंतर, सक्षम अधिकाऱ्याने संबंधित पदनिर्देशित अधिकाऱ्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही सुरू करणे संकल्पित आहे. (कलम -१२)
- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ नुसार बहु-सदस्यीय आयोग घटित करण्याची तरतूद आहे. या अधिनियमाच्या उचित अंमलबजावणीची सुनिश्चिती करणे व अधिक चांगल्यारितीने लोकसेवा देण्याची सुनिश्चिती करण्याकरिता राज्य शासनाला सूचना करणे हे, आयोगाचे कर्तव्य आहे. (कलम -१६)
- राज्य शासन, कलम १६ मधील पोट-कलम (१) च्या खंड (ग), (घ) आणि (ङ) अन्वये, आयोगाने केलेल्या शिफारशींचा विचार करील आणि केलेल्या कार्यवाहीची माहिती, तीस दिवसांच्या आत किंवा आयोगाशी विचारविनिमय करून ठरविण्यांत येईल अशा त्यानंतरच्या कालावधीत, आयोगाकडे पाठवील. (कलम -१७)
- द्वितीय अपीलीय प्राधिकाऱ्याच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या पात्र व्यक्तीस किंवा पदनिर्देशित अधिकाऱ्यास, असा आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या कालावधीच्या आत आयोगाकडे अपील दाखल करता येईल. (कलम -१८)
- लोकसेवा मिळण्यासाठी पात्र व्यक्तींकडून विविध प्रमाणपत्रे, दस्तऐवज, शपथपत्रे, इत्यादी सादर करण्याबाबतची मागणी कमी करण्यासाठी सर्व सार्वजनिक प्राधिकरणे कालमर्यादित प्रभावी उपाययोजना करतील. सार्वजनिक प्राधिकरण, अन्य विभागाकडून किंवा सार्वजनिक प्राधिकरणांकडून थेटपणे आवश्यक माहिती प्राप्त करण्यासाठी समन्वयाने प्रयत्न करतील. {कलम २० (१)}
- द्वितीय अपीलीय प्राधिकाऱ्याकडून किंवा मुख्य आयुक्ताकडून, किंवा यथास्थिती, आयुक्ताकडून, पदनिर्देशित अधिकाऱ्याकडून होणाऱ्या वारंवार कसुरीबद्दल लेखी माहिती प्राप्त झाल्यावर, संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाचा प्रमुख, कसुरदार अधिकाऱ्यावर कारणे दाखवा नोटीस बजावून व त्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी देऊन, तशा आशयाच्या निष्कर्षाची नोंद केल्यानंतर, योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्यास सक्षम असेल. {कलम -२० (३)}
- पदनिर्देशित अधिकाऱ्याला प्रोत्साहन देण्यासाठी व त्याची कार्यक्षमता वाढविण्यासाठी, सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रमुखास, ज्याच्या विरुद्ध एका वर्षात कसुरीची कोणतीही नोंद करण्यात आलेली नसेल व जो नियत कालमर्यादेच्या आत लोकसेवा देत असेल अशा पदनिर्देशित अधिकाऱ्याला शासनाकडून अधिसूचित करण्यात येईल इतकी रोख रक्कम प्रोत्साहन म्हणून, प्रशस्ती प्रमाणपत्रासह, देता येईल, आणि तसेच, संबंधित अधिकाऱ्याच्या सेवा अभिलेखात त्याबाबतची नोंद देखील घेण्यात येईल. {कलम २० (५ क)}
- राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने साध्य करताना जी सार्वजनिक प्राधिकरणे उत्कृष्ट कामगिरी पार पाडतील अशा प्राधिकरणांचा गौरव करण्यासाठी योग्य पारितोषिके देता येतील. {कलम २० (५ ख)}
- जर पात्र व्यक्ती, अर्जात जाणून बुजून खोटी किंवा चूकीची माहिती देत असेल किंवा अर्जासोबत खोटे दस्तऐवज सादर करीत असेल आणि अशा माहितीच्या किंवा दस्तऐवजांच्या आधारे या अधिनियमाअन्वये लोकसेवा मिळवित असेल तर, अशा प्रकरणी, अंमलात असलेल्या दंडविधीच्या संबंधित तरतुदींअन्वये त्याच्या विरुद्ध कारवाई करण्यात येईल. (कलम -२३)



Scanned with OKEN Scanner

# जोडपत्र-२

## Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Chhatrapati Sambhajinagar

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर**

**Board of Examinations and Evaluation**

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**The List of Notifies Public Services under the Maharashtra Right to Public Services Act, 2015**

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क आयोग अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा. ३१) च्या कलम ३ मधील पोट-कलम (१) अन्वये**

| Sr. No. | Name of Public Services | Stipulated Time Limit for Providing Services (Working Days) | Concern Authority/ Officer for Approval of Service | Appeliate Officer for Complaint |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | सेवेचे नाव | सेवा मंजूर करण्याची कालमर्यादा (कार्य दिन) | सेवा मंजूर करणारे प्राधिकारी/अधिकारी | तक्रार दाखल करण्यासाठी संबंधित अपिलीय अधिकारी |
| 1. | Application for Admission Extract | 15 Days | Bhagwan Narayanrao Phad, Assistant Registrar<br>श्री. भगवान नारायणराव फड, सहायक कुलसचिव | Dr. V.M. Karhale, Deputy Registrar and First Appeliate Officer & Dr. B.N. Dole, Director, BoEE and Second Appeliate Officer<br>डॉ. विष्णू मारोती कऱ्हाळे, उपकुलसचिव तथा प्रथम अपील प्राधिकारी आणि वरिष्ठ प्रोफेसर (डॉ.) बाबासाहेब एन. डोळे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ तथा द्वितीय अपील प्राधिकारी |
| १. | प्रवेश अर्जाचा सारांश मिळवण्यासाठी अर्ज | १५ दिवस | | |
| 2. | Application for Provisional Degree Certificate | 15 Days | | |
| २. | तात्पुरते पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज | १५ दिवस | | |
| 3. | Application for Verification of Genuineness of Marks Card/Degree Certificate | 30 Days | | |
| ३. | गुणपत्रिका/पदवी प्रमाणपत्र यांची सत्यता पडताळणीचा अर्ज | ३० दिवस | | |
| 4. | Application for Readmission | 30 Days | | |
| ४. | पुनर्प्रवेश अर्ज | ३० दिवस | | |
| 5. | Application for Distribution of Marks Card | 15 Days | | |
| ५. | गुणपत्रिकासाठी अर्ज | १५ दिवस | | |
| 6. | Application for Degree Certificate | 30 Days | | |
| ६. | पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज | ३० दिवस | | |
| 7. | Application for Duplicate Migration Certificate | 15 Days | | |
| ७. | दुय्यम प्रवजन प्रमाणपत्रासाठी अर्ज | १५ दिवस | | |
| 8. | Application for Removal of Non-Completion of Lower Examination | 30 Days | | |
| ८. | निम्न स्तरीय परीक्षा अपूर्ण हा शेरा काढण्यासाठी अर्ज | ३० दिवस | | |
| 9. | Application for Removal of Withheld from the Marks Card | 30 Days | | |
| ९. | राखीव हा शेरा काढण्यासाठी अर्ज | ३० दिवस | | |
| 10. | Application for Distribution of Scholarship | 30 Days | | |
| १०. | शिष्यवृत्ती वितरणासाठी अर्ज (फक्त विद्यापीठा अंतर्गत शिष्यवृत्ती) | ३० दिवस | | |
| 11. | Application for Issue of Duplicate Copies of Documents | 30 Days | | |
| ११. | कागदपत्रांच्या दुय्यम प्रती मिळण्याकरीता अर्ज | ३० दिवस | | |
| 12. | Application for Photocopy of Answer Scripts | 15 Days | | |
| १२. | उत्तर पत्रिकेची छायाप्रत मिळण्याकरिता अर्ज | १५ दिवस | | |
| 13. | Application for Revaluation of Answer Scripts | 30 Days | | |
| १३. | उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकनाकरिता अर्ज | ३० दिवस | | |
| 14. | Application for Syllabus Certification | 15 Days | | |
| १४. | अभ्यासक्रम प्रमाणित करून घेण्यासाठी अर्ज | १५ दिवस | | |
| 15. | Application for Issue of Eligibility Certificate (SSLC) | 30 Days | | |
| १५. | पात्रता प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज (एस.एस.एल.सी.) | ३० दिवस | | |
| 16. | Application for Issue of Consolidated Marks Card | 15 Days | | |
| १६. | एकत्रित गुणपत्रिका मिळण्याकरिता अर्ज | १५ दिवस | | |
| 17. | Application for Issue of Passing Certificate | 15 Days | | |
| १७. | उत्तीर्ण प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज | १५ दिवस | | |
| 18. | Application for Character Certificate | 15 Days | | |
| १८. | चारित्र्य प्रमाणपत्रासाठी अर्ज | १५ दिवस | | |
| 19. | Application for Identity Card | 15 Days | | |
| १९. | ओळखपत्रासाठी अर्ज | १५ दिवस | | |
| 20. | Application for Original Document | 15 Days | | |
| २०. | मूळ कागदपत्रे परत करण्यासाठी अर्ज | १५ दिवस | | |

वरिष्ठ प्रोफेसर (डॉ.) बाबासाहेब एन. डोळे,
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ तथा
द्वितीय अपील प्राधिकारी